<u>**नियमीत दिवाणी दावा क्र. ७९/२०१३ मधील निशाणी क्र. ११७ वरील आदेश.**</u>

**१.** वादीने वादपत्रामध्ये विशेष करून फेरफार नोंद क्रमांक ६१६८ च्या ठिकाणी फेरफार नोंद क्रमांक ६१६७ अशा दुरूस्तीस परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार ती अनावधानाने टंकलेखनातील चुक आहे. त्यामुळे दाव्यातील स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. त्यामुळे वादीने दुरूस्तीस परवानगी देण्याची विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादी विशेषत: प्रतिवादी क्रमांक ९ यांनी प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्ज सुमारे पाच वर्षाच्या विलंबाने दाखल केलेला आहे. नियोजीत दुरूस्तीने दाव्याच्या स्वरूपामध्ये बदल होणार आहे. त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**३.** दोन्ही पक्षकारांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. त्या नुसार संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने वादपत्रामध्ये परिच्छेद क्रमांक ४ मध्ये असे नमूद केले आहे की, भागाजी आणि तात्या यांच्या मृत्यूनंतर दिनांक ३०/०७/१९६२ रोजी फेरफार नोंद क्रमांक ६१६८ अन्वये सामाईकात नावे लागली. नियोजीत दुरूस्तीने वादी फेरफार नोंद क्रमांक ६१६८ च्या ठिकाणी ६१६७ अशा दुरूस्तीस परवानगी मागत आहे. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्रमांक ९ ने अनेक वेळा वादीने फेरफार नोंद क्रमांक ६१६८ ची प्रत अभिलेखावर दाखल करण्याबाबत आदेश व्हावे अशी विनंती केली. त्या नुसार निशाणी ९६ वरील आदेशाप्रमाणे वादीने सदरील फेरफार संबंधीची कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्याचे आदेश झाले. त्यानंतर सुमारे पाच महिन्यांच्या विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**४.** **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७** ची तरतुद विचारात घेता वादीने त्याच्या प्रस्तुत अर्जातील कथना पुष्ठयर्थ स्वत:चे शपथपत्र निशाणी क्रमांक १८ वर दाखल केले आहे. दाव्याची सुनावणी अद्याप सुरू झालेली नाही. या उलट काही प्रतिवादींना समन्सची अद्याप बजावणी झालेली नाही. अशा परिस्थितीत वादीचे कथन विचारात घेता नियोजीत दुरूस्ती ही दोन्ही पक्षकारांमधील वादावर निर्णय देण्यासाठी आवश्यक वाटते. त्या दुरूस्तीने दाव्याच्या स्वरूपामध्येही बदल होण्याचे कारण दिसुन येत नाही. परंतु प्रतिवादी क्रमांक ९ ने या संबंधी ब-याचदा आक्षेप घेऊनही वादीने त्या संबंधी तात्काळ कार्यवाही केली नाही. अशा परिस्थितीत वादी हा निश्चीतपणे खर्चाच्या जबाबदारीस पात्र ठरतो. या सर्व बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१. वादीचा निशाणी क्रमांक ११७ वरील अर्ज रक्कम रुपये १,०००/- च्या खर्चास अधिन राहुन मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदर अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये मुदतीत योग्य ती दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयात दाखल करावी.

(सुहास प्र. भोसले)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
राहाता.

दिनांक :- १९/०७/२०१८.